| MHAH070005332017 | <u>विशेष खटला क्र. ३९/२०१७ आदेश नि.३५</u><br>महाराष्ट्र शासन<br>वि.<br>सुभाष रुपचंद ठुबे |
|---|---|

१. प्रथमखबर वाचली असता असे निदर्शनास येते की, फिर्यादी प्रविण पराड जात हिंदू महार चे डोळासणे गावात, मराठा समाजाचा सुभाष रुपचंद ठुबे, गुरवा समाजाचा सागर रघुनाथ भालेराव व लमाण समाजाचा नितीन लक्ष्मण पवार असे मित्र आहे. फिर्यादी महार समाजाचा असल्याचे त्यांना माहिती आहे. फिर्यादीचा मित्र नवज्योत सुभाष काकड याचेसोबत सुभाष ठुबे चा जुना वाद असून दि.२७/०२/२०१७ चे १० ते १५ दिवसांपूर्वी सुभाष ठुबे हा दारु पिऊन " तु नवज्योत काकड, विद्युत काकड यांचेसोबत राहू नको" असे फिर्यादीला म्हणाला होता.

२. प्रथमखबरमध्ये पुढे असे नमुद आहे की, दिनांक २६/०२/२०१७ रोजी सायंकाळी ०६.०० वा. चे सुमारास फिर्यादी गावातील सुभाष बबन काकड यांचे दुकानाचे बाहेर पटांगणामध्ये उभा असतांना गुरव समाजाचा सागर भालेराव ने फिर्यादीला खाली पाडून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. नितीन लक्ष्मण पवार यानेही फिर्यादीला लाथाबुक्यांनी मारहाण केली. सागर भालेराव म्हणाला की, "महार, घेडपटा तुझे कोण येणार आहे त्यांना कापून टाकतो" व दगड उचलुन "तू येथे थांबायचे नाही, तू येथे थांबलास तर तुला मारुन टाकीन" अशी धमकी देऊन जाती वाचक शिवीगाळ केली. त्यानंतर नवज्योत सुभाष काकड, सुभाष बबन काकड यांनी सोडवासोडव केली. प्रविण पराड ने दिलेल्या प्रथम माहिती/फिर्यादी आधारे भारतीय दंड संहिता कलम ३२३, ५०४, ५०६, ३४ आणि अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम कलम ३(१)(r)(s) अन्वये गुन्हा रजि. क्र.०३/२०१७, दि.२७.०२.२०१७ रात्री१२.०८ वा. घारगाव पोलीस ठाणे येथे नोंद करण्यात आला.

३. अर्जदार/आरोपी क्र.३ सुभाष रुपचंद ठुबे याचे जामीन नि.३५ चे अर्जातील कथन व त्याचे सुविद्य विधीज्ञ श्री. आर. आर. पेठकर यांचा युक्तीवाद आहे की, अर्जदार/आरोपी यास पकड वॉरंटमध्ये अटक केली असून तो मागील तारखेस महत्वाचे कामानिमित्त बाहेरगावी गेल्याने न्यायालयात हजर राहू शकला नाही. आरोपी हा मागील तारखांना हजर राहत होता. यापुढे आरोपी तारखेस हजर राहण्यास कसूर करणार नाही. अर्जदार/आरोपी विरुध्द खोटा व बनावट स्वरुपाचा गुन्हा दाखल केला असून त्याचा गुन्हयाशी काही एक संबंध नाही. आरोपी/अर्जदार एकमेव कमावता असून त्याचेवर वृध्द आईवडीलांची जबाबदारी आहे. आरोपी सर्वसामान्य घरातील असून त्याचा सदर गुन्हयात प्रत्यक्ष सहभाग नाही. तो न्यायालयाचे अटींचे व शर्तींचे पालन करेल.

४. अतिरीक्त सरकारी अभियोक्ता श्री. बी. जी. कोल्हे यांचे म्हणणे नि.३६ मधील कथन व युक्तीवाद असा आहे की, अर्जदार/आरोपी विरुध्द अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती कायदा कलम ३(१) (आर) (एस) तसेच भा.द.वि. कलम ३२३, ५०४, ५०६ व सह ३४ प्रमाणे दाखल असून आरोपी क. ३ हा दि. १७/०५/२०२४ ते दि.०७/०७/२०२५ रोजी दरम्यान गैरहजर होता. आरोपीने दि. ०६/०८/२०२४ रोजी वॉरंन्ट रद्द करुन घेतले आहे. त्यानंतरही आरोपी दि. १९/०६/२०२५ रोजी गैरहजर असल्यामुळे त्याच्या विरुध्द वॉरंन्टचा हुकूम झाला आहे. दि. ०३/०९/२०२५ रोजी पुन्हा आरोपीने वॉरंन्ट रद्द करुन दंड भरलेला आहे. तरी देखील आरोपी हा दि. ०४/११/२०२५ रोजी गैरहजर असल्यामुळे पकड वॉरंट काढले आहे. वरील सर्व परिस्थितीचा विचार करता आरोपी न्यायालयात तारखेस हजर राहात नाही. त्यामुळे सदर केस चालविण्यास उशिर होत आहे. आरोपी याने वेळोवेळी न्यायालयाने वॉरंन्ट रद्द करतांना केलेल्या अटी व शर्तीचा भंग केलेला आहे. त्यामुळे आरोपीचा जामीन अर्ज रद्द करण्यात यावा व सदर केस आरोपी यास जेलमध्ये

ठेवुन चालविण्यात यावी अन्यथा आरोपी पुन्हा चौकशीकामी गैरहजर राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदरचा अर्ज रद्द करण्यात यावा.

५. विवाद्य कथने, दोषारोपपत्रासोबत दाखल केलेली तपासाची कागदपत्रे व युक्तीवाद साकल्याने विचारात घेतला. दि.०४/११/२०२५ रोजी अर्जदार/आरोपी क्र.३ सुभाष ठुबे न्यायालयात गैरहजर असल्यामुळे त्याचे विरुध्द वॉरंट काढण्याचा आदेश करण्यात आला. त्या आदेशाला अनुसरुन घारगाव पोलीसांनी आरोपीस वॉरंट बाजावून दि.३०/११/२०२५ रोजी अटक करुन दि.०१/१२/२०२५ रोजी त्यास न्यायालयासमोर हजर केले असता त्यास न्यायालयीन कोठडी देण्यात आले.

६. गुन्हयाचा तपास पुर्ण झाला आहे. २०१७ च्या खटल्यात दोषारोपनिश्चिती होऊन, साक्षीदारांच्या साक्षी नोंदवून न्यायनिर्णय होण्यास कालावधी लागेल. इतका कालावधी अर्जदार/आरोपी क्र.३ सुभाष ठुबे यास न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे प्रयोजन नाही. त्यामुळे अटी व शर्तींना अधीन त्यास जामीन मंजुर करणे न्यायोचित होईल.

## <u>आदेश</u>

अ. अर्ज नि.क्र.३५ मान्य केला आहे.

ब. घारगाव पोलीस ठाणेचा गुन्हा रजि.क्र.०३/२०१७ चे कामी अर्जदार/आरोपी क्र.३ सुभाष रुपचंद ठुबे चा रक्कम रुपये ५०,०००/– चा वैयक्तिक जात मुचलका व जामीनदार स्वीकारुन त्याला जामीनावर मुक्त करण्यात यावे.

क. गुन्हा रजि. क्रमांक ०३/२०१७ मधील फिर्यादी व साक्षीदार यांच्याशी अर्जदार/आरोपी क्र.३ ने कोणत्याही स्वरुपाचा संपर्क करु नये, त्यांच्यावर दबाव, दडपण, धाक, अमिष, प्रलोभन ईत्यादींचा वापर करु नये.

ड. गुन्हा रजि. क्रमांक ०३/२०१७ चे पुराव्यामध्ये अर्जदार/आरोपी क्र.३ ने कोणत्याही स्वरुपाचा हस्तक्षेप करु नये, छेडछाड व फेरफार करु नये.

इ. अर्जदार/आरोपी व जामीनदार यांनी त्यांचे आधारकार्ड, पॅनकार्ड, निवडणूक ओळखपत्र, वाहन चालविण्याचा परवाना यांपैकी कोणत्याही एका ओळखपत्राची सत्यप्रत जामीन देतेवेळी सादर करावी.

MANDAR RAMCHANDRA NERLEKAR

Digitally signed by MANDAR RAMCHANDRA NERLEKAR
Date: 2025.12.06 13:35:53 +0530

संगमनेर ( मंदार नेरलेकर )

दिनांक –०६/१२/२०२५. अतिरिक्त सत्र न्यायाधीश,

संगमनेर.